वाचा:- १. संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र.२१, दिनांक १७/४/१९७९.
२. संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र.२५, दिनांक २८/१०/१९८८.
३. संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र.१६, दिनांक ३१/१०/१९९७.

---

**स्था-१८/ ब / अहवाल शाखा / वलेप अहवाल /न.क्र. २३४/**

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, सहावा मजला, कोकण भवन,
नवी मुंबई ४०० ६१४**

**स्थायी आदेश क्रमांक** ०१ **/ २०१७** **दिनांक** 18 JAN 2017

विषय :- **जिल्हा परिषद / पंचायत समिती लेखापरीक्षण अहवालात भाग-१ मध्ये सुधारणा करणेबाबत.**

उपरोक्त वाचा मधील क्र.१ ते ३ अन्वये संचालनालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षण अहवालाची बांधणी व मांडणी संदर्भात आदेश निर्गमित केले आहेत.

वाचा क्र. ३ मधील मुद्या क्र. १ (लेखापरीक्षण अहवालातील भाग-१) मध्ये लेखापरीक्षण वर्ष, मागील लेखापरीक्षण अहवालातील प्रलंबित परिच्छेदांचे क्रमांक व एकूण परिच्छेद संख्या दर्शविण्यात येते. त्यामध्ये सदरहू परिच्छेदांमध्ये किती परिच्छेद स्वनिधी व शासन निधीचे व कोणते परिच्छेद पंचायत राज समिती पुनर्विलोकन अहवालात समाविष्ठ करण्यात आलेले आहेत याचा उल्लेख नाही. त्यामुळे मागील लेखापरीक्षणाबाबत संक्षिप्त स्वरुपात यथोचित माहिती उपलब्ध होत नाही. तसेच जिल्हा कार्यालयांकडून संचालनालयास प्राप्त झालेल्या लेखापरीक्षण अहवालांतील भाग १ चे अवलोकन केले असता त्यामध्ये एकसुत्रता दिसून येत नाही.

यास्तव सर्व नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचे सन २०१५-२०१६ च्या लेखापरीक्षणापासून लेखापरीक्षण अहवाल तयार करतांना खालील नमुन्यात भाग १ (मागील लेखापरीक्षण) तयार करून अहवाल निर्गमित करण्यात यावा.

**भाग पहिला (मागील लेखापरीक्षण)**
--------------------------विभाग, जिल्हा परिषद ------------------सन २०१५-२०१६

| ले.प.वर्ष | प्रलंबित परिच्छेद क्रमांक | | एकूण परिच्छेद | पं.रा.स. / नागरी स्व.सं.च्या ले.प. पुनर्विलोकन अहवालातील परि.क्र. ------/ सांकेतांक क्र.------- | पं.रा.स. / नागरी स्व.सं.च्या ले.प. पुनर्विलोकन अहवालात अंतर्भूत परिच्छेदाचा संक्षिप्त तपशिल |
|---|---|---|---|---|---|
| | स्वनिधी | शासन निधी (केंद्र / राज्य) | | | |
| | | | | | |
| | | | | | |

तथापि उपरोक्त कार्यालयीन आदेशांनुसार भाग १ मधील इतर बाबी प्रचलित पध्दतीनुसारच नमुद कराव्यात.

(प्रताप मोहिते)
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य

प्रत:-

सर्व विभागीय सह संचालक व जिल्हा सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा.

D : asa karyalayin aadesh१८११७